वस्त्रोद्योग विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या शासन प्रक्रिया पुनर्रचना (Government Process Re-engineering-GPR) उपक्रमांतर्गत प्रशासकीय प्रक्रिया सुलभ, सुटसुटीत व गतिमान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांक: सपवि-४००१२/५/२०२६-DESKSERICULTURE-CMTD

नवीन प्रशासकीय भवन, १४ वा मजला, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

दिनांक: ०५ नोव्हेंबर २०२६

वाचा -

१. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण १७२५/प्र.क्र. १२६/मातं, दि. ३०.०५.२०२५.
२. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दि.०२.०६.२०२३ (एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८).
३. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.धोरण-२०२३/प्र.क्र.८१-अ/टेक्स-५, दि.१२.१२.२०२३.
४. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.धोरण-२०२३/प्र.क्र.८१-अ/टेक्स-५, दि.०६.०३.२०२४.
५. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दि.२८.०८.२०२४ (एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत वस्त्रोद्योग प्रकल्पांसाठी भांडवली अनुदान योजनेची मार्गदर्शक तत्त्वे).
६. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांचे पत्र क्र. हातमाग/विविध/योजना महाडिबीटी/३७६९/२०२६, दि. २४.०६.२०२६ (हातमाग विणकरांसाठीच्या योजना).
७. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४७/का.१४११, दि. ०३.०८.२०२६.
८. शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, क्र. मऔधो-२०२३/प्र.क्र.१८७/उद्योग-२, दि. ३१.१२.२०२५.
९. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.प्राविियो-२०१८/प्र.क्र. ९०/रेशीम कक्ष, दिनांक ९ फेब्रुवारी, २०२४. (सिल्क समग्र-२ योजनेचा तपशील व मार्गदर्शक तत्त्वे)
१०. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.हातमाग-२०२३/प्र.क्र.९२/ टेक्स-३, दि.०९.११.२०२३ (गणेश उत्सव भत्ता योजना).
११. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र हातमाग-२०२३/प्र.क्र.६२/ टेक्स -३, दि.१०.११.२०२३ (हातमाग विणकर कुटुंबांना प्रतिमाह २०० युनिट पर्यंत मोफत वीज योजना)
१२. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.हातमाग-२०२३/प्र.क्र.९४/टेक्स-३, दि.१०.११.२०२३ व शासन शुद्धीपत्रक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.हातमाग-२०२३/प्र.क्र.९४/टेक्स-३, दि.२२.०२.२०२४ (कच्चा माल पुरवठा योजनेतील (आरएमएसएस) धाग्यावर हातमाग विणकरांना अतिरीक्त अनुदान देणे)

१३. वस्त्रोद्योग विभागाच्या शासन प्रक्रिया पुनर्रचना (GPR) आढाव्यातून प्राप्त झालेल्या शिफारशी व निर्णय, तसेच राज्यस्तरीय GPR मान्यता समितीने दि. २८.१०.२०२६ रोजी घेतलेला आढावा.

प्रस्तावना-

महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागामार्फत वस्त्रोद्योग घटक, रेशीम उद्योग क्षेत्र तसेच हातमाग विणकरांच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात येतात. एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत पात्र वस्त्रोद्योग घटकांना वाचा क्र. २ ते ५ येथील शासन निर्णयांमधील तरतुदींनुसार भांडवली अनुदान, वीज अनुदान तसेच इतर विविध प्रोत्साहने देण्यात येतात. तसेच, रेशीम संचालनालयामार्फत रेशीम उद्योगाच्या कोषपूर्व (Pre-Cocoon) व कोषोत्तर (Post-Cocoon) क्षेत्रांच्या विकासासाठी केंद्र शासनाच्या सहाय्याने "सिल्क समग्र-२" योजना राबविण्यात येते. याशिवाय, वस्त्रोद्योग आयुक्तालयामार्फत हातमाग विणकरांचे उत्पन्न वाढविणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे, विपणनासाठी सहाय्य उपलब्ध करून देणे तसेच शाश्वत रोजगाराच्या संधी निर्माण करणे या उद्दिष्टांनी विविध योजना राबविण्यात येतात.

सदर योजनांच्या प्रचलित कार्यपद्धतीमध्ये माहितीची अनेक क्षेत्रे (Data Fields), पूरक कागदपत्रांची आवश्यकता तसेच छाननीचे विविध स्तर समाविष्ट आहेत. त्यामुळे अर्जदारांना एकच माहिती व कागदपत्रे योजनांच्या विविध टप्प्यांवर वारंवार सादर करावी लागतात. वस्त्रोद्योग घटकांसाठीच्या भांडवली अनुदान व वीज अनुदान योजनांकरिता आवश्यक माहिती स्वतंत्र पोर्टलवर सादर करणे व वेळोवेळी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. तसेच, सिल्क समग्र-२ योजनेंतर्गत अर्ज ऑफलाईन पद्धतीने सादर करण्याची कार्यपद्धती प्रचलित होती व अर्ज सादर करण्यापूर्वी पूर्वमान्यता (Pre-Approval) घेणे आवश्यक होते. हातमाग विणकरांनाही योजनांचा लाभ घेण्यासाठी स्वतंत्र नोंदणी करणे तसेच प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक होते. परिणामी, योजनांच्या अर्ज प्रक्रियेत अनावश्यक पुनरावृत्ती होऊन अर्जदारांना अतिरिक्त प्रशासकीय प्रक्रियेला सामोरे जावे लागते. तसेच, अर्जांची छाननी व मंजुरी यासाठी अपेक्षेपेक्षा अधिक कालावधी लागतो आणि त्याचा परिणाम योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर होण्यासोबतच प्रशासकीय यंत्रणेवरही अतिरिक्त कामाचा ताण निर्माण होतो.

शासकीय सेवा व योजनांचे लाभ नागरिकांपर्यंत अधिक सुलभ, पारदर्शक, कालबद्ध व कार्यक्षम पद्धतीने पोहोचविण्याच्या उद्देशाने वस्त्रोद्योग विभागामार्फत "शासन प्रक्रिया पुनर्रचना" (Government Process Re-engineering -GPR) उपक्रमांतर्गत कार्यवाही हाती घेण्यात आली. या अनुषंगाने विभाग व विभागाच्या अधिनस्त कार्यालयांतील अधिकारी, प्रादेशिक व क्षेत्रीय कार्यालये तसेच संबंधित तंत्रज्ञान पथके यांच्याशी विचारविनिमय करून योजनांच्या विद्यमान कार्यपद्धतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये अर्जातील माहिती क्षेत्रे, आवश्यक कागदपत्रे, छाननीचे स्तर, उपलब्ध शासकीय माहिती संचांचा (Databases) वापर तसेच विविध डिजिटल प्रणालींचे एकात्मिकरण या बाबींचा विचार करण्यात आला.

सदर GPR प्रक्रियेअंतर्गत योजनांच्या अंमलबजावणीतील प्रशासकीय प्रक्रिया सुलभ व कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे शिफारशी करण्यात आल्या आहेत.

अ) **भांडवली अनुदान योजना :** अर्जातील माहिती क्षेत्रे व पूरक कागदपत्रांची संख्या कमी करणे, छाननीच्या स्तरांचे एकत्रीकरण करणे, अर्ज प्रक्रिया मैत्री (MAITRI) पोर्टलशी एकात्मिक करणे तसेच विभागीय स्तरावरील छाननीसाठी ई-टेक्सटाईल (eTextile) पोर्टलचा वापर करणे.

ब) **वीज अनुदान योजना :** माहितीची दुबार नोंदणी टाळण्यासाठी योजनेची प्रक्रिया एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर एकात्मिक करणे.

क) **हातमाग विणकरांच्या योजना :** विणकरांची एकत्रित नोंदणी व्यवस्था विकसित करणे, सर्व योजनांसाठी एकच नोंदणी व अर्ज प्रक्रिया लागू करणे तसेच अर्जातील माहिती क्षेत्रे व आवश्यक कागदपत्रांची संख्या कमी करणे.

ड) **सिल्क समग्र-२ योजना :** लाभार्थ्यांची एकवेळ नोंदणी करणे, महाडीबीटी पोर्टलद्वारे पूर्णतः ऑनलाईन अर्ज प्रक्रिया राबविणे, पूर्वमान्यतेची (Pre-Approval) अट रद्द करणे तसेच अर्जांच्या छाननी व मंजुरीचे स्तर कमी करणे.

नियोजन विभागाच्या दि. ०३.०८.२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार, संबंधित विभागाच्या मान्य GPR शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करणे व त्यानुसार महाआयटीला औपचारिकरित्या अवगत करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने, वस्त्रोद्योग विभागाच्या योजनांचा GPR अंतर्गत करण्यात आलेल्या आढाव्यातून प्राप्त झालेल्या तसेच राज्यस्तरीय GPR मान्यता समितीच्या दि. २८.१०.२०२६ रोजीच्या आढाव्यात विचारात घेण्यात आलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता, वस्त्रोद्योग विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या भांडवली अनुदान, वीज अनुदान, हातमाग विणकरांच्या विविध योजना तसेच सिल्क समग्र-२ या योजनांच्या मूळ उद्दिष्टे व पात्रतेच्या मूलभूत तरतुदींमध्ये कोणताही बदल न करता, केवळ योजनांच्या अंमलबजावणीतील प्रशासकीय व प्रक्रियात्मक बाबी सुलभ, सुटसुटीत व कालबद्ध करण्याच्या दृष्टीने वरीलप्रमाणे GPR शिफारशी लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय -

वस्त्रोद्योग विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी अधिक सुलभ, पारदर्शक, कालबद्ध व कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने, तक्ता-१ मध्ये नमूद केलेल्या योजनांसाठी शासन प्रक्रिया पुनर्रचना (Government Process Re-engineering - GPR) उपक्रमांतर्गत या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या प्रक्रियात्मक सुधारणांना शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

तक्ता-१: या शासन निर्णयाच्या कक्षेत येणाऱ्या योजना

अ.क्र.	योजनेचे नाव	अंमलबजावणी करणारे कार्यालय	डिजिटल प्लॅटफॉर्म
अ. वस्त्रोद्योग घटक - एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८			
१	वस्त्रोद्योग घटकांसाठी भांडवली अनुदान योजना	वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर	मैत्री (MAITRI) पोर्टल
२	वस्त्रोद्योग घटकांसाठी वीज अनुदान योजना	वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर	मैत्री (MAITRI) पोर्टल
ब. हातमाग विणकर			
३	हातमाग विणकर कुटुंबांना दरमहा २०० युनिटपर्यंत मोफत वीज	वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर	महाडीबीटी पोर्टल
४	गणेश चतुर्थीनिमित्त उत्सव भत्ता योजना	वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर	महाडीबीटी पोर्टल

अ.क्र.	योजनेचे नाव	अंमलबजावणी करणारे कार्यालय	डिजिटल प्लॅटफॉर्म
५	कच्चा माल पुरवठा योजना (RMSS)	वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर	महाडीबीटी पोर्टल
क. रेशीम उद्योग			
६	सिल्क समग्र-२ योजना (कोषपूर्व) - घटक	रेशीम संचालनालय, नागपूर	महाडीबीटी पोर्टल
७	सिल्क समग्र-२ योजना (कोषोत्तर) - घटक	रेशीम संचालनालय, नागपूर	महाडीबीटी पोर्टल

सदर योजनांसाठी सुधारित अर्जांचे नमुने, अर्जामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या माहिती क्षेत्रांचा (Data Fields) तपशील तसेच आवश्यक कागदपत्रांच्या याद्या या शासन निर्णयासोबत परिशिष्टांच्या स्वरूपात जोडण्यात आल्या आहेत. सदर परिशिष्टांची यादी तक्ता-२ मध्ये नमूद करण्यात आली आहे.

तक्ता-२: परिशिष्टांची यादी

परिशिष्ट	शीर्षक	योजना
A.	साइन अप फॉर्म (घटक नोंदणी)	भांडवली अनुदान व वीज अनुदान योजना
B.	घटक नोंदणी - TRN व कागदपत्रांची यादी	भांडवली अनुदान व वीज अनुदान योजना
C.	व्यवसाय अर्ज नमुना (अनुदान अर्ज) व कागदपत्रांची यादी	भांडवली अनुदान व वीज अनुदान योजना
D.	शेतकरी नोंदणी (सिल्क समग्र-२)	सिल्क समग्र-२ योजना
E.	कोषपूर्व घटक (सिल्क समग्र-२)	सिल्क समग्र-२ योजना
F.	कोषोत्तर प्रक्रियेसाठी वैयक्तिक नोंदणी (सिल्क समग्र-२)	सिल्क समग्र-२ योजना
G.	कोषोत्तर प्रक्रियेसाठी उद्योग नोंदणी (सिल्क समग्र-२)	सिल्क समग्र-२ योजना
H.	कोषोत्तर घटक (सिल्क समग्र-२)	सिल्क समग्र-२ योजना
I.	हातमाग विणकर नोंदणी	हातमाग योजना
J.	दरमहा २०० युनिटपर्यंत मोफत वीज	हातमाग योजना
K.	गणेश चतुर्थीनिमित्त उत्सव भत्ता योजना	हातमाग योजना
L.	कच्चा माल पुरवठा योजना (RMSS)	हातमाग योजना

१. व्याप्ती व लागू होणे

१.१ या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या प्रक्रियात्मक सुधारणा वस्त्रोद्योग विभागामार्फत प्रचलित शासन निर्णय व धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वांनुसार राबविण्यात येणाऱ्या तक्ता-१ मध्ये नमूद पुढील योजनांना लागू राहतील:-

(अ) राज्यातील वस्त्रोद्योग घटकांसाठीच्या भांडवली अनुदान व वीज अनुदान योजना;

(ब) हातमाग विणकरांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना; आणि

(क) सिल्क समग्र-२ योजना.

१.२. या शासन निर्णयाद्वारे मान्य करण्यात आलेल्या प्रक्रियात्मक सुधारणा डिजिटल अर्ज व नोंदणी, माहितीची नोंद, कागदपत्रे सादर करणे, अर्जांची छाननी, कार्यप्रवाह (Workflow), विविध पोर्टल्समधील समन्वय, अर्जांवरील कार्यवाही तसेच, संबंधित तरतुदींमध्ये नमूद केल्याप्रमाणे आर्थिक सहाय्याचे वितरण या बाबींना लागू राहतील. तथापि, संबंधित योजनांच्या लाभार्थ्यांच्या पात्रतेच्या अटी, अनुज्ञेय बाबी व घटक, अनुदानाचे दर, आर्थिक मर्यादा, तांत्रिक निकष, अटी व शर्ती तसेच इतर मूलभूत तरतुदी यापूर्वी निर्गमित केलेल्या संबंधित शासन निर्णय व मार्गदर्शक तत्त्वांनुसार पूर्ववत लागू राहतील. यासंदर्भात शासनाने स्वतंत्रपणे निर्गमित केलेल्या नंतरच्या आदेशांद्वारे काही सुधारणा करण्यात आल्यास, त्या सुधारणा संबंधित मर्यादेपर्यंत लागू राहतील.

२. सर्व योजनांसाठी सामायिक तरतुदी-

२.१ **एकवेळ नोंदणी (One-Time Registration) :** प्रत्येक योजनेसाठी अथवा प्रत्येक अर्ज सादर करताना लाभार्थ्यांना समान माहितीची पुनर्नोंदणी करावी लागू नये, या उद्देशाने संबंधित लाभार्थी प्रवर्गांसाठी एकवेळ नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. त्यानुसार, वस्त्रोद्योग घटकांची नोंदणी मैत्री (MAITRI) पोर्टलवर, हातमाग विणकरांची नोंदणी एकत्रित विणकर नोंदणी प्रणालीद्वारे, तर सिल्क समग्र-२ योजनेच्या लाभार्थ्यांची नोंदणी महाडीबीटी पोर्टलवर करण्यात येईल. एकदा नोंदणी पूर्ण झाल्यानंतर, संबंधित लाभार्थ्यांना प्रत्येक योजनेसाठी किंवा प्रत्येक अर्जासाठी समान मूलभूत माहितीची पुनर्नोंदणी करण्याची आवश्यकता राहणार नाही.

२.२ **उपलब्ध माहितीचा वापर (Data Reuse) :** संबंधित माहिती शासकीय माहिती संचांमध्ये (Government Databases) अथवा प्राधिकृत डिजिटल प्रणालींमध्ये उपलब्ध असल्यास, तांत्रिक व्यवहार्यता, संबंधित Application Programming Interface (API) ची उपलब्धता तसेच आवश्यकतेनुसार अर्जदाराची संमती या बाबींच्या अधीन राहून, सदर माहितीचा पुनर्वापर करण्यात येईल. त्यानुसार, उपलब्ध माहिती अर्जामध्ये पूर्वप्राप्त (Pre-fetch), स्वयंचलितरीत्या प्राप्त (Auto-fetch) अथवा स्वयंचलितरीत्या भरली (Auto-fill) जाईल. यामध्ये महाआयडी (MahaID), वस्तू व सेवा कर (GST), APISetu, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (MSEDCL), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) तसेच इतर संबंधित शासकीय व उपयुक्तता सेवा (Utility Services) प्रणालींद्वारे उपलब्ध होणाऱ्या माहितीचा समावेश असेल.

२.३ **Pre-fetch, Auto-fill व प्रणालीआधारित पडताळणी :** Pre-fetch, Auto-fill तसेच प्रणालीआधारित पडताळणीची अंमलबजावणी महाआयडी व इतर संबंधित शासकीय आणि उपयुक्तता (Utility) प्रणालींच्या API द्वारे माहितीची उपलब्धता, सुलभता व विश्वासार्हता यांवर अवलंबून राहील. संबंधित माहिती API अथवा प्रणालींच्या एकात्मिकरणाद्वारे उपलब्ध होऊ शकत नसल्यास, संबंधित योजनेच्या प्रचलित मार्गदर्शक तत्त्वांनुसार व पोर्टलवर विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार आवश्यक माहिती अथवा पूरक कागदपत्रे सादर करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

२.४ **माहिती सुरक्षा व गोपनीयता :** वस्त्रोद्योग विभाग, वस्त्रोद्योग आयुक्तालय, रेशीम संचालनालय तसेच संबंधित तंत्रज्ञान संस्थांनी प्रचलित शासकीय सूचना, नियम व धोरणांनुसार डिजिटल प्रणालींमध्ये योग्य प्रवेश नियंत्रण (Access Controls), माहितीची सुरक्षा, व्यवहारांच्या लेखापरीक्षण नोंदी (Audit Trails) यांची व्यवस्था करावी. तसेच, अर्जदारांनी सादर केलेल्या व विविध शासकीय प्रणालींद्वारे प्राप्त झालेल्या माहितीची गोपनीयता व सुरक्षितता सुनिश्चित करावी.

३. वस्त्रोद्योग घटकांसाठीच्या भांडवली अनुदान योजनेचे सुलभीकरण-

३.१ भांडवली अनुदान योजनेची अर्ज व नोंदणी प्रक्रिया या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ (Sign-up Form), परिशिष्ट-ब (घटक नोंदणी-TRN) व परिशिष्ट-क (व्यवसाय अर्ज नमुना) यांमध्ये नमूद केलेल्या सुधारित माहिती क्षेत्रे व कागदपत्रांच्या आवश्यकतेनुसार सुलभ करण्यात येईल.

३.२ अर्ज प्रक्रियेतील माहिती क्षेत्रांची संख्या ११४ वरून १०२ इतकी, तर पूरक कागदपत्रांची संख्या ३० वरून २८ इतकी कमी करण्यात येईल. GPR वर्कबुकमध्ये वगळणे, कायम ठेवणे, नव्याने समाविष्ट करणे, पूर्वप्राप्त (Pre-fetch) करणे अथवा स्वयंचलितरीत्या भरणे (Auto-fill) यासाठी निश्चित केलेली माहिती क्षेत्रे व कागदपत्रे त्यानुसार लागू करण्यात येतील.

३.३ संबंधित माहिती शासकीय माहिती संचांमध्ये अथवा प्राधिकृत प्रणालींमध्ये उपलब्ध असल्यास, या शासन निर्णयातील परिच्छेद २.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाआयडी (MahaID), वस्तू व सेवा कर (GST), APISetu, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (MSEDCL) तसेच इतर संबंधित शासकीय प्रणालींद्वारे सदर माहिती पूर्वप्राप्त (Pre-fetch) अथवा स्वयंचलितरीत्या अर्जामध्ये समाविष्ट (Auto-fill) करण्यात येईल.

३.४ भांडवली अनुदान योजनेची अर्ज प्रक्रिया मैत्री (MAITRI) पोर्टलशी एकात्मिक करण्यात येईल. त्यानुसार, अर्जदार मैत्री पोर्टलद्वारे अर्ज सादर करेल, तर वस्त्रोद्योग विभागाकडून अर्जांची छाननी व पुढील कार्यवाही ई-टेक्सटाईल (eTextile) पोर्टलद्वारे करण्यात येईल. यासाठी दोन्ही पोर्टल्समध्ये आवश्यक प्रणाली एकात्मिकरण करून अर्ज व त्यासंबंधित माहितीचे सुरक्षितपणे आदान-प्रदान करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

३.५ वस्त्रोद्योग नोंदणी क्रमांक (Textile Registration Number-TRN) सेवा मैत्री (MAITRI) पोर्टलवर स्थलांतरित करण्यात येईल. त्यानुसार, लागू सेवा आवश्यकतांनुसार TRN ची नोंदणी व निर्मिती मैत्री पोर्टलद्वारे करण्यात येईल. तथापि, प्रचलित वस्त्रोद्योग धोरण व संबंधित योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ज्या प्रयोजनांसाठी TRN आवश्यक आहे, त्या प्रयोजनांसाठी TRN ची आवश्यकता पूर्वीप्रमाणे कायम राहील

३.६ अर्जांच्या छाननीसाठी असलेल्या टेबलांची (Desks) संख्या आठ (८) वरून पाच (५) इतकी कमी करण्यात येईल. तसेच, छाननी प्रक्रियेतील L२ व L३ हे स्तर एकत्रित करण्यात येतील. त्यानुसार सुधारित छाननी कार्यप्रवाह (Workflow) प्रणालीआधारित (System-driven) करण्यात येईल, जेणेकरून नस्तींची प्रत्यक्ष हाताळणी कमीत कमी होऊन अर्ज प्रक्रिया अधिक गतिमान होईल

३.७ GPR आढाव्यामध्ये विचारात घेण्यात आलेल्या उद्योग विभागाच्या दि. ३१.१२.२०२५ रोजीच्या धोरणातील व्याख्येनुसार स्थिर भांडवली गुंतवणूक (Fixed Capital Investment-FCI) या संज्ञेबाबत आवश्यक स्पष्टीकरण व माहिती क्षेत्रांच्या शीर्षकांमध्ये (Field Labels) सुधारणा करण्यात येतील. तसेच, नोंदविण्यात आलेले अथवा परिगणित केलेले एकूण अनुदान/प्रोत्साहन हे पात्र स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या १०० टक्क्यांपेक्षा अधिक होत असल्यास, लागू धोरणात्मक तरतुदींनुसार प्रणालीद्वारे सूचना (System Alert) देण्याची व्यवस्था करण्यात येईल. सदर सूचना ही केवळ पडताळणी अथवा तपासणीसाठीची यंत्रणा म्हणून कार्य करेल. त्यामुळे योजनेच्या पात्रता निकषांमध्ये अथवा अनुज्ञेयतेच्या मूलभूत तरतुदींमध्ये कोणताही बदल होणार नाही.

३.८ GPR वर्कबुकमध्ये निश्चित करण्यात आलेली अनिवार्य नसलेली माहिती क्षेत्रे, भारत सरकारला नियतकालिक अहवाल सादर करणे तसेच धोरणनिर्मिती, संनियंत्रण व मूल्यमापन यांसाठी आवश्यक असेल त्या मर्यादेपर्यंत कायम ठेवण्यात येतील. तथापि, अशी माहिती क्षेत्रे अनिवार्य माहिती क्षेत्रांपासून स्पष्टपणे वेगळी दर्शविण्यात येतील.

३.९ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (MIDC) क्षेत्रातील भूखंडांशी संबंधित जमिनीचा तपशील आवश्यक API व तांत्रिक एकात्मिकरणाची उपलब्धता यांवर अवलंबून राहून संबंधित MIDC प्रणालीद्वारे पूर्वप्राप्त (Pre-fetch) अथवा स्वयंचलितरीत्या प्राप्त (Auto-fetch) करण्यात येईल.

३.१० लागू योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सचिव (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील समिती, परिपूर्ण अर्ज व आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्याच्या आणि योजनेच्या लागू तरतुदींचे पालन झाल्याच्या अधीन राहून, परिपूर्ण प्रस्तावांवर साठ (६०) दिवसांच्या आत निर्णय घेईल. या शासन निर्णयाद्वारे स्पष्टपणे मान्य करण्यात आलेल्या प्रक्रियात्मक सुधारणांव्यतिरिक्त, योजनेअंतर्गत सध्याची सक्षम प्राधिकारी व मान्यता देण्याची व्यवस्था पूर्वीप्रमाणे कायम राहील.

३.११ GPR आढाव्यादरम्यान विचारात घेण्यात आलेला प्रोत्साहन अर्जांना सचिव (वस्त्रोद्योग) यांच्या लॉगिनद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आलेला नाही. त्यामुळे, प्रचलित शासन निर्णयांनुसार विहित करण्यात आलेले मान्यता प्राधिकारी व समिती यंत्रणा पूर्वीप्रमाणेच कार्यरत राहतील.

४. वस्त्रोद्योग घटकांसाठीच्या वीज अनुदान योजनेचे सुलभीकरण व एकात्मिकरण

४.१ वस्त्रोद्योग घटकांसाठीच्या वीज अनुदान योजनेची अर्ज व प्रक्रिया यंत्रणा एकत्रित डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी तसेच माहितीची दुबार नोंदणी टाळण्यासाठी, ई-टेक्सटाईल (eTextile) पोर्टलवर एकात्मिक करण्यात येईल. यासाठी आवश्यकतेनुसार मैत्री (MAITRI) पोर्टलशी आवश्यक प्रणाली एकात्मिकरण व समन्वय साधण्यात येईल.

४.२ सद्यस्थितीत स्वतंत्र पोर्टलद्वारे राबविण्यात येणारी अर्ज व प्रक्रिया यंत्रणा एकात्मिक डिजिटल प्रणालीमध्ये स्थलांतरित करण्यात येईल. संबंधित वस्त्रोद्योग घटकाची माहिती एकात्मिक प्रणालीमध्ये एकदा उपलब्ध झाल्यानंतर, तीच माहिती विविध पोर्टल्सवर स्वतंत्रपणे पुन्हा नोंदविण्याची आवश्यकता अर्जदारास राहणार नाही.

४.३ वीज अनुदान योजनेसाठी सुधारित अर्जातील माहिती क्षेत्रे व आवश्यक कागदपत्रांचा तपशील, यामध्ये वीज पुरवठादार, ग्राहक क्रमांक, वीज वापराचा तपशील व त्यासंबंधित कागदपत्रांचा समावेश राहील. सदर तपशील या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-ब व परिशिष्ट-क मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील. GPR वर्कबुकमध्ये निश्चित करण्यात आलेली माहिती क्षेत्रे व कागदपत्रे तांत्रिक व्यवहार्यता तसेच संबंधित माहिती व API एकात्मिकरणाची उपलब्धता यांनुसार एकात्मिक पोर्टलवर समाविष्ट (Configure) करण्यात येतील

४.४ सुधारित डिजिटल कार्यप्रवाहाद्वारे ऑनलाईन अर्ज सादर करणे, वस्त्रोद्योग घटक व वीज वापरासंबंधी तपशील नोंदविणे, अर्जांची छाननी व त्यावरील पुढील कार्यवाही तसेच योजनेचे संनियंत्रण करणे शक्य होईल. वीज पुरवठादार, ग्राहक क्रमांक, वीज पुरवठा प्रवर्ग, मंजूर विद्युत भार (Sanctioned Load) व वीज वापरासंबंधी माहिती संबंधित वीज वितरण कंपनीच्या अथवा उपयुक्तता (Utility) प्रणालीच्या API द्वारे उपलब्ध होत असल्यास, ती माहिती एकात्मिक प्रणालीमध्ये पूर्वप्राप्त (Pre-fetch) अथवा स्वयंचलितरीत्या प्राप्त करण्यात येईल

४.५ लागू योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन तसेच परिपूर्ण अर्ज व आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्याच्या अधीन राहून, वीज अनुदान योजनेअंतर्गत परिपूर्ण प्रस्तावांवर शासनाकडून साठ (६०) दिवसांच्या आत निर्णय घेण्यात येईल.

५. सिल्क समग्र-२ योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रियेचे सुलभीकरण-

५.१ सिल्क समग्र-२ योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या तक्ता-३ मध्ये नमूद सर्व कोषपूर्व (Pre-Cocoon) व कोषोत्तर (Post-Cocoon) घटकांसाठी या शासन निर्णयाद्वारे मान्य करण्यात आलेली सुधारित कार्यपद्धती लागू राहील.

तक्ता-३: सिल्क समग्र-२ योजनेअंतर्गत समाविष्ट घटक

अ.क्र.	कोषपूर्व घटक (Pre-Cocoon)	अ.क्र.	कोषोत्तर घटक (Post-Cocoon)
१	तुती लागवड (Plantation)	१	मल्टी-एंड रिलिंग युनिटची स्थापना (१० एंड / १० बेसिन युनिट)
२	सिंचन	२	एकात्मिक स्वयंचलित रिलिंग यंत्र (IARM)
३	किटक संगोपन गृह (Rearing House)	३	ट्विस्टिंग युनिट
४	किटक संगोपन साहित्य (Rearing Equipment)	४	जल पुनर्चक्रण संयंत्र (Water Recycling Plant)
५	निर्जंतुकीकरण औषधे (Disinfectant)	५	रेशीम विणकाम क्षेत्रासाठी सहाय्य
६	किसान नर्सरी	६	रंगाई व प्रक्रिया युनिटसाठी सहाय्य
७	चॉकी किटक संगोपन केंद्र (तुती)	७	प्युपा प्रक्रिया युनिटसाठी सहाय्य
८	वन्य खाजगी अंडीपुंज निर्मिती केंद्र (टसर)	८	सेरीसीन निष्कर्षण युनिट (डिगमिंग प्रक्रियेसाठी आर्थिक सहाय्य)
९	लाभार्थी सक्षमीकरण कार्यक्रम	केंद्रीय रेशीम मंडळाच्या सिल्क समग्र-२ योजनेच्या प्रमाणित कार्यपद्धती (SOP) व मार्गदर्शक तत्त्वांनुसार इतर कोषोत्तर घटक	

५.२ **लाभार्थी नोंदणी:** योजनेअंतर्गत सर्व पात्र घटकांसाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे एकसमान व प्रमाणित लाभार्थी (शेतकरी) नोंदणीची व्यवस्था लागू करण्यात येईल. लाभार्थ्याची नोंदणी एकदाच करण्यात येईल व त्यानंतर संबंधित लाभार्थ्यास योजनेअंतर्गत पात्र असलेल्या सर्व घटकांसाठी स्वतंत्रपणे अर्ज करता येईल. लाभार्थ्याकडून समान माहिती व कागदपत्रांची वारंवार मागणी होऊ नये, यासाठी शासनाकडे यापूर्वीच उपलब्ध असलेली अथवा लाभार्थ्याने पूर्वी सादर केलेली माहिती व कागदपत्रे, तांत्रिक व्यवहार्यता व लागू तरतुदींच्या अधीन राहून, माहितीचा पुनर्वापर (Data Reuse) या तत्त्वानुसार वापरण्यात येतील.

५.३ **अर्ज प्रक्रिया**: योजनेअंतर्गत अर्ज यापूर्वी ऑफलाईन पद्धतीने सादर करण्यात येत होते. तथापि, यापुढे योजनेची संपूर्ण अर्ज प्रक्रिया महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येईल. त्यानुसार, लाभार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलद्वारे नोंदणी करणे, अर्ज सादर करणे, अर्जाची सद्यःस्थिती जाणून घेणे तसेच मंजूर लाभ प्राप्त करणे शक्य होईल. अर्ज सादर करण्यापूर्वी पूर्वमान्यता (Pre-Approval) घेण्याची पूर्वीची अट रद्द करण्यात येत आहे. योजनेचा सुधारित अर्ज नमुना या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-ड नुसार लागू करण्यात येईल.

५.४ **छाननी व मान्यता**: योजनेअंतर्गत प्राप्त अर्जांची छाननी व मान्यता महाडीबीटी पोर्टलवरील प्रमाणित कार्यप्रवाहाद्वारे (Standardized Workflow) करण्यात येईल. यापूर्वी आठ (८) स्तरांवर होणारी छाननी व मान्यतेची प्रक्रिया सुलभ करून ती चार (४) टप्प्यांमध्ये पूर्ण करण्यात येईल. तसेच, योजनेअंतर्गत विविध

घटकांसाठी आवश्यक असलेल्या पूरक कागदपत्रांची संख्या शक्य तितकी कमी करण्यात येईल. शासनाकडे अथवा इतर प्राधिकृत शासकीय प्रणालींमध्ये उपलब्ध असलेली माहिती व कागदपत्रे, तांत्रिक व्यवहार्यता व संबंधित प्रणालींच्या एकात्मिकरणाच्या उपलब्धतेच्या अधीन राहून, स्वयंचलितरीत्या प्राप्त (Auto-fetch) करण्यात येतील व माहितीचा पुनर्वापर (Data Reuse) या तत्त्वानुसार वापरण्यात येतील.

५.५ **अनुदानाचे वितरण**:-योजनेअंतर्गत मंजूर आर्थिक सहाय्य संबंधित योजनेच्या प्रचलित मार्गदर्शक तत्त्वांनुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे आदेश व निर्देश यांच्या अधीन राहून पात्र लाभार्थ्यांना वितरित करण्यात येईल. सदर आर्थिक सहाय्याचे वितरण महाडीबीटी प्रणालीद्वारे करण्यात येईल व थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer-DBT) प्रणालीमार्फत अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्याच्या पात्र बँक खात्यात जमा करण्यात येईल.

६. हातमाग विणकरांसाठीच्या योजनांचे सुलभीकरण

६.१ एकत्रित विणकर नोंदणी : पूर्वी प्रचलित असलेल्या योजनानिहाय स्वतंत्र विणकर नोंदणीऐवजी हातमाग विणकरांसाठी एकत्रित नोंदणीची कार्यपद्धती लागू करण्यात येत आहे. एकदा एकत्रित नोंदणी पूर्ण केल्यानंतर विणकरास तक्ता-१ मध्ये नमूद सर्व योजनांसाठी पुन्हा स्वतंत्र नोंदणी करण्याची आवश्यकता राहणार नाही. नोंदणीसाठी आवश्यक माहिती क्षेत्रांची संख्या २१ वरून ११ इतकी आणि आवश्यक कागदपत्रांची संख्या ५ वरून २ इतकी कमी करण्यात येत आहे. नोंदणीसाठीची सुधारित माहिती क्षेत्रे व आवश्यक कागदपत्रे परिशिष्ट-I मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील

६.२ माहितीची पुनरावृत्ती टाळणे : प्रत्येक योजनेसाठी समान माहितीची वारंवार नोंद करण्याची आवश्यकता दूर करण्यात येत आहे. एकत्रित नोंदणीच्या वेळी सादर केलेली तसेच संबंधित शासकीय प्रणालींमध्ये उपलब्ध असलेली माहिती आवश्यकतेनुसार पूर्वप्राप्त (Pre-fetch) व स्वयंचलितरीत्या अर्जात भरण्याची (Auto-fill) सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. या प्रक्रियेमुळे सर्व योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांची एकूण संख्या २९-३१ वरून ७-८ इतकी कमी करण्यात येईल

६.३ **योजनानिहाय अर्ज प्रक्रियेचे सुलभीकरण :** पुढील योजनांसाठी अर्जातील माहिती क्षेत्रे व आवश्यक कागदपत्रे संबंधित परिशिष्टांमध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील :-

(अ) हातमाग विणकर कुटुंबांना दरमहा २०० युनिटपर्यंत मोफत वीज देण्याची योजना -परिशिष्ट-J.

(ब) पाच पारंपरिक वस्त्र प्रकारांतील प्रमाणित व नोंदणीकृत विणकरांसाठी गणेश चतुर्थीनिमित्त सण भत्ता योजना-परिशिष्ट-K.

(क) कच्चा माल पुरवठा योजना (RMSS) अंतर्गत हातमाग विणकरांना सुतावर अतिरिक्त अनुदान देण्याची योजना -परिशिष्ट-L.

उपरोक्त परिशिष्टांमध्ये प्रत्येक माहिती क्षेत्र व कागदपत्र अनिवार्य किंवा ऐच्छिक असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. तसेच, लागू असेल त्याप्रमाणे माहिती पूर्वप्राप्त (Pre-fetch) करणे, स्वयंचलितरीत्या भरणे (Auto-fill), कागदपत्र अपलोड करणे, ड्रॉपडाऊनमधून पर्याय निवडणे किंवा चेकबॉक्सद्वारे माहिती नोंदविणे याबाबतची कार्यपद्धतीही दर्शविण्यात आली आहे.

६.४ **ऑनलाईन अर्ज मागोवा, डिजिटल कार्यप्रवाह व लाभ वितरण :** हातमाग विणकरांना त्यांनी सादर केलेल्या अर्जाची सद्यःस्थिती ऑनलाईन पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. अर्जांची छाननी व मान्यता यासाठी पूर्वीच्या हस्तलिखित व मानवी प्रक्रियेऐवजी डिजिटल कार्यप्रवाह (Digital Workflow) लागू करण्यात येईल. तसेच, संबंधित योजनांअंतर्गत मंजूर लाभांचे वितरण थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer-DBT) प्रणालीद्वारे करण्यात येईल.

७. योजनांच्या सध्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे सातत्य-

७.१ या शासन निर्णयात स्पष्टपणे नमूद केलेल्या प्रक्रियात्मक व डिजिटल प्रक्रिया सुधारणा वगळता, भांडवली अनुदान योजनेसंदर्भातील दि. २८.०८.२०२४ रोजीचा शासन निर्णय व वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सुधारणा यांसह सर्व शासन निर्णय व मार्गदर्शक तत्त्वांमधील सर्व तरतुदी अपरिवर्तित राहतील व पूर्वीप्रमाणे लागू राहतील.

७.२ त्याचप्रमाणे, वीज अनुदान योजनेसंदर्भातील पात्रतेचे निकष, लागू अनुदानाचे दर, पात्र घटक, परिगणनेची पद्धत, अनुदान वितरणाच्या अटी व इतर अटी व शर्ती यांसह सर्व विद्यमान शासन निर्णय, आदेश व मार्गदर्शक तत्त्वे, शासनाकडून स्वतंत्रपणे सुधारणा करण्यात येईपर्यंत, अंमलात राहतील.

७.३ सिल्क समग्र-२ योजनेच्या बाबतीत, विहित पात्रतेचे निकष, आर्थिक सहाय्याचे स्वरूप, अनुज्ञेय घटक, तांत्रिक निकष, अनुदानाचा दर व इतर अटी व शर्ती, शासनाकडून स्वतंत्रपणे सुधारणा करण्यात येईपर्यंत, पूर्वीप्रमाणे लागू राहतील.

७.४ हातमाग विणकरांसाठीच्या योजनांच्या बाबतीत, योजनांचे विद्यमान पात्रतेचे निकष, लाभ व इतर अटी व शर्ती, शासनाकडून स्वतंत्रपणे सुधारणा करण्यात येईपर्यंत, पूर्वीप्रमाणे लागू राहतील.

७.५ या शासन निर्णयातील प्रक्रियात्मक तरतुदी व योजनांची विद्यमान मार्गदर्शक तत्त्वे यांमध्ये कोणतीही विसंगती आढळल्यास, या शासन निर्णयाद्वारे स्पष्टपणे मान्य करण्यात आलेल्या प्रक्रियात्मक सुधारणांच्या मर्यादेपुरत्याच या शासन निर्णयातील तरतुदी अधिभावी ठरतील. योजनांच्या सर्व मूलभूत तरतुदी विद्यमान धोरण व शासन आदेशांनुसार पूर्वीप्रमाणे लागू राहतील.

८. अंमलबजावणी व जबाबदाऱ्या-

८.१ आयुक्त (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वस्त्रोद्योग विभाग व संबंधित तंत्रज्ञान संस्था यांच्याशी विचारविनिमय करून भांडवली अनुदान योजना, वीज अनुदान योजना व हातमाग विणकरांसाठीच्या योजनांकरिता सुधारित अर्ज नमुने, छाननी कार्यप्रवाह व पोर्टल एकात्मिकरण यांच्या अंमलबजावणीबाबत समन्वय साधावा व अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

८.२ संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर यांनी सिल्क समग्र-२ योजनेअंतर्गत प्रक्रियात्मक सुधारणांची प्रभावी व कालबद्ध अंमलबजावणी सुनिश्चित करावी व याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

८.३ या शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रक्रिया कार्यान्वित करण्यासाठी मैत्री (MAITRI) पोर्टल, ई-टेक्सटाईल (eTextile) पोर्टल व महाडीबीटी पोर्टल यांमध्ये योग्य ती रचना (Configuration) व एकात्मिकरण करण्यात यावे. सुधारित प्रक्रिया कार्यान्वित करण्यापूर्वी संबंधित संस्थांनी आवश्यक तांत्रिक बदल, API एकात्मिकरण, माहितीचे मॅपिंग (Data Mapping), चाचणी व वापरकर्ता स्वीकृती (User Acceptance) ची कार्यवाही करावी. या शासन निर्णयाची प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी महाआयटीस औपचारिकरित्या कळविण्यात यावी.

८.४ आयुक्त (वस्त्रोद्योग) व संचालक, रेशीम संचालनालय यांनी संबंधित प्रादेशिक व क्षेत्रीय कार्यालयांना आवश्यक त्या कार्यपद्धतीविषयक सूचना निर्गमित कराव्यात व सुधारित अर्ज व नोंदणी प्रक्रियेबाबत अर्जदारांना अवगत करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

८.५ भांडवली अनुदान योजना, वीज अनुदान योजना, सिल्क समग्र-२ व हातमाग विणकरांसाठीच्या योजनांमधील प्रक्रियात्मक सुधारणा आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय पूर्वतयारी पूर्ण झाल्यानंतर

विभागाकडून अधिसूचित करण्यात येणाऱ्या दिनांकापासून अंमलात आणण्यात येतील. तोपर्यंत सध्याची प्रक्रिया सुरू राहील.

८.६ आयुक्त (वस्त्रोद्योग) व संचालक, रेशीम संचालनालय यांनी अंमलबजावणीचे संनियंत्रण करावे व अर्जांवरील प्रक्रिया, प्रलंबितता, पोर्टलची कार्यक्षमता आणि API/माहितीच्या उपलब्धतेशी संबंधित अडचणी याबाबतचे नियतकालिक अहवाल विभागास सादर करावेत.

